# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
## Date – 04 October 2023
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi

## आकाशवाणी औरंगाबाद
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ०४ ऑक्टोबर २०२३ सायंकाळी ६.१०

****

- उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी गॅस सिलिंडर अनुदान २०० रुपयांवरून तीनशे रुपये
- हळद आणि हळदीच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी राष्ट्रीय हळद मंडळाची स्थापना
- डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात केंद्रीय युवक महोत्सवाला आजपासून प्रारंभ

आणि

- आशियायी क्रीडा स्पर्धेत भारताला आज दोन सुवर्ण तर बीडच्या अविनाश साबळेला पाच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्य पदक

****

उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गॅस सिलिंडरच्या अनुदानात सरकारनं प्रति सिलिंडर शंभर रुपयांची वाढ केली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सध्या मिळणाऱ्या २०० रुपये प्रति सिलिंडरवरून हे अनुदान ३०० रुपये प्रति सिलिंडर करण्यात आल्याचं ठाकूर यांनी यावेळी सांगितलं. ते म्हणाले –

***आज से जो घोषणा हो रही है, उसमें उज्वला के लाभार्थी जो बहनें हैं, उनको दो सौ रूपये के बजाय अब तीन सौ रूपये सबसिडी मिलेगी। करोडो बहनों को एक बार फिर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी की ओर से बडी राहत मदत के रूप मे उनको आज का ये निर्णय किया गया है।***

राष्ट्रीय हळद मंडळ स्थापन करण्याबाबतची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. हळद आणि हळदीच्या उत्पादनांना चालना देण्याच्या उद्देशाने हे मंडळ स्थापन करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे

हळदीची निर्यात सोळाशे कोटी रुपयांवरून आठ हजार चारशे कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचं उद्दीष्ट निर्धारित करण्यात आलं असल्याचं ठाकूर यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेलंगणात काल एका सभेदरम्यान याची घोषणा केली होती.

कृष्णा नदी जलवाटप प्रकरणी द्वितीय प्राधिकरणाच्या नव्या नियमावलीला केंद्रीय मंत्रिमंडळाने आजच्या बैठकीत मान्यता दिली.

****

भारतीय स्टेट बँकेने हस्तचलित बँक उपकरण सेवेला आजपासून प्रारंभ केला. या माध्यमातून खातेधारकांना आपल्या खात्यातून घरबसल्या रोख रक्कमेच आहरण तसंच भरणा करणं, रक्कम हस्तांतरित करणं, खात्यातली शिल्लक जाणून घेणं, आदी सुविधा मिळणार आहेत. दिव्यांग तसंच ज्येष्ठ नागरिकांसाठी ही सुविधा विशेष लाभदायक ठरणार आहे.

****

रिझर्व बँकेच्या वित्त आणि पतधोरण आढावा समितीची बैठक आज मुंबईत सुरु झाली. या वर्षीचा द्वैवार्षिक वित्त आणि पत धोरण आढावा रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास शुक्रवारी सकाळी १० वाजता जाहीर करतील. गेल्या आढाव्यात व्याजदरांमधे कोणताही बदल रिझर्व बँकेनं केला नव्हता.

****

राज्यातील स्पर्धा परीक्षा उमेदवारांच्या अडचणी आणि समस्या राज्यपालांनी सोडवाव्यात अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. पटोले यांनी विद्यार्थी प्रतिनिधींसह आज राजभवन इथं राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी दूर करण्यासंदर्भात निवेदन सादर केलं. विविध विभागांच्या भरती प्रक्रिया तसंच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पेपरफुटी तसंच कॉपीचे अनेक प्रकार उघडकीस आले आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी राजस्थान आणि उत्तराखंड राज्याप्रमाणे कठोर कायदा

महाराष्ट्रात लवकरात लवकर व्हावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि नागपूर या रुग्णालयामध्ये झालेल्या रुग्ण मृत्यू प्रकरणी सर्वस्वी राज्य सरकार जबाबदार असल्याचा आरोप विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. दानवे यांनी आज नांदेड इथं दगावलेल्या रुग्णांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केलं, त्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. नांदेडचे पालकमंत्री फक्त झेंडावंदनासाठीच नांदेडला येतात, अशी टीकाही दानवे यांनी केली.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही आज नांदेड इथं संबंधित रुग्णालयाला भेट देऊन माहिती घेतली. या शासकीय रुग्णालयात झालेले मृत्यू हे सरकारी अनास्थेचे बळी असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

****

राज्यातल्या १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारीत यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केली. सुधारित यादीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद देण्यात आलं आहे. अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील असतील तर सोलापूर आणि अमरावती जिल्ह्यांचं पालकमंत्रीपद चंद्रकांत पाटील यांच्याकडे सोपवण्यात आलं आहे.

भंडाऱ्याचे पालकमंत्री विजयकुमार गावित तर बुलढाण्याचे पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील असतील. हसन मुश्रीफ यांच्याकडे कोल्हापूर तर धर्मराव बाबा आत्राम यांच्याकडे गोंदिया जिल्ह्याची जबाबदारी आली आहे. बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे तर परभणीचे संजय बनसोडे असतील. अनिल पाटील यांच्याकडे नंदुरबार जिल्हा तर सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे वर्धा जिल्हा पालकमंत्रीपद देण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात केंद्रीय युवक महोत्सवाला आजपासून प्रारंभ झाला. अभिनेता योगेश शिरसाट आणि अभिनेत्री अनुष्का सरकटे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महोत्सवाला प्रारंभ झाला. या महोत्सवात अडीचशे महाविद्यालयांचे सुमारे तीन हजार विद्यार्थी कलावंत

सहभागी झाले आहेत. चार दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ३६ विविध कलाप्रकारात सादरीकरण होणार आहे.

****

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियायी क्रीडा स्पर्धेत भारताने आजच्या दिवसात दुपारपर्यंत दोन सुवर्ण, तीन रौप्य आणि चार कांस्य पदकं पटकावली.

तिरंदाजीच्या कपाउंड प्रकारात ओजस देवतळे आणि ज्योती सुरेखा वेन्नम या मिश्र जोडीने सुवर्णपदक पटकावलं. भालाफेक प्रकारात नीरज चोपडाने सुवर्णपदक पटकावलं तर किशोर दिनाने रौप्य पदक पटकावलं. बीडच्या अविनाश साबळेनं पाच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक पटकावलं. महिलांच्या आठशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत हरमिलन बैंस हिने तर मुष्टियुद्ध स्पर्धेत लवलीना बोर्गोहेन हिने रौप्यपदक मिळवलं. ३५ किलोमीटर चालण्याच्या स्पर्धेत रामबाबू आणि मंजूराणीने, मुष्ठियुद्ध प्रकारात परवीन हुड्डा हिने तर कुस्तीत सुनीलकुमार याने कांस्य पदक पटकावलं. स्क्वॉशच्या मिश्र दुहेरीत अनाहत सिंह आणि अभय सिंह जोडीनेही कांस्यपदकाला गवसणी घातली.

पदकतालिकेत १७ सुवर्ण, २९ रौप्य आणि ३२ कांस्यपदकांसह एकूण ७८ पदकं जिंकत भारतीय संघ चौथ्या क्रमांकावर कायम आहे. या स्पर्धेत भारताची आतापर्यंतही ही सर्वोत्तम कामगिरी आहे. यापूर्वी भारताने गेल्या वेळच्या आशियायी स्पर्धेत ७० पदकं पटकावली होती.

****

एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला उद्यापासून सुरूवात होत आहे. उद्या अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी क्रीडा संकुलाच्या मैदानावर इंग्लंड आणि न्युझीलंडदरम्यान उद्घाटनाचा सामना होणार आहे. भारताचा या स्पर्धेतला पहिला सामना ऑस्ट्रेलियासोबत येत्या रविवारी आठ ऑक्टोबरला चेन्नई इथं एम ए चिदंबरम् मैदानावर होणार आहे.

****

शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने होऊ दे चर्चा ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात करमाड इथं माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी या मोहिमेअंतर्गत मार्गदर्शन केलं.

****

पिकांना पाणी देण्यासाठी वीज पुरवठ्याच्या मागणीसाठी हिंगोली जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी सेनगाव इथं तीन तास रास्ता रोको आंदोलन केलं. आंदोलनामुळे जवळपास तीन तास या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. वीज वितरण कंपनीच्या वतीनं सहायक उपअभियंता सत्यनारायण वडगावकर, कनिष्ठ अभियंता पंकज घुहे यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आलं.

****

धाराशिव शहरापासून अवघ्या सहा सात किलोमीटर परिसरात असलेल्या वरवंटी आणि वडगाव तसंच तुळजापूर तालुक्यातील अपसिंगा, कामठा या गावांच्या शिवारात मागील सहा- सात दिवसांपासून बिबट्याचा वावर आढळला आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांना वडगाव इथं सिद्धेश्वर मंदिराच्या पाठीमागील जंगलात बिबट्या दिसल्यामुळे, वनविभागाने आसपासच्या गावात दवंडी देऊन नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. बिबट्या आढळल्यास त्याच्या पाठीमागे जाऊ नये किंवा त्याचा फोटो काढण्याचा प्रयत्न करू नये, तत्काळ गावातील सरपंच, पोलीस पाटील आणि वनविभागाशी संपर्क साधावा, असं सांगण्यात आलं आहे

****

छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मारक आणि स्मृतीवन उभारले जात आहे. यात एक संग्रहालय तसंच ठाकरे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारी फोटो गॅलरी थाटली जाणार आहे. या सर्व कामाची मनपा प्रशासक जी. श्रीकांत यांनी आज पाहणी केली. या पाहणीदरम्यान प्रशासकांनी कंत्राटदार एजन्सीला विविध सूचना केल्या.

****